# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.) जि.पालघर
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१-०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०- २५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२७३

विभाग : सामान्य प्रशासन
दिनांक : २२/०८/२०२५

१) प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "आय" वसई कार्यालय क्षेत्रातील किल्लाबंदर, पाचुबंदर, नायगाव, व पाणजु जेटीवर दि.२८/०८/२०२५, दि.३१/०८/२०२५, दि.०२/०९/२०२५ व ०६/०९/२०२५ या दिवशी मनुष्य बळासहित भाडेतत्वावर बोटीची व्यवस्था करणेकामी प्राप्त निविदा पैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- बी-२

प्रशासकीय मान्यता :- प्रशासकीय ठराव क.११२५, दिनांक २२/०७/२०२५

निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- २३/०७/२०२५

निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- ३०/०७/२०२५

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- सहाय्यक आयुक्त

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे:-

| अ. क्र | निविदाधारकाचे नांव | दरपत्रकधारकांचे प्राप्त झालेला दर (प्रति बोट) |
|---|---|---|
| १ | आत्माराम नारायण कोळी | ४६२०/- |
| २ | अजय गजानन कोळी | ४४९९/- |
| ३ | करण एकनाथ तरे | ५२००/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्या नुसार श्री. अजय गजानन कोळी यांचे दरपत्रकेतील न्युनतम दर रक्कम रु. ४४९९/- प्रति बोट प्राप्त झाला आहे.

दि. ०१/ ०८/२०२५ रोजी अन्वये मा.निविदा समितीने श्री.अजय गजानन कोळी हयांच्या दरपत्रकातील दर प्रती बोट रक्कम रु. ४४९९ /- दराचे दरपत्रकाच्या मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये उपरोक्त कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी विषय शिफारशीसह पुढील उचित निर्णयास्तव सविनय सादर.

या कामी संविदा मंजुरी प्राप्त करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

..२..

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा.आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठराव क्र.११२५ दि.२२/०७/२०२५ |
| २ | निविदा प्रसिध्दी करणे | १८/०७/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | २८/०७/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे. | ३०/०७/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव. | १२/०८/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | १९/०८/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे. | २७/०८/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | ०७/०९/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | २३/०९/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | ३०/०९/२०२५ |

**ठराव** :- सदर काम खालील नमुद कालावपधीत पुर्ण होणे अपेक्षित आहे.


| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | मा.आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठराव क्र.११२५ दि.२२/०७/२०२५ |
| २ | निविदा प्रसिध्दी करणे | १८/०७/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | २८/०७/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे. | ३०/०७/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव. | १२/०८/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे/ करारनामा करणे. | १९/०८/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे. | २७/०८/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | ०७/०९/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | २३/०९/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | ३०/०९/२०२५ |


..3..

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील किल्लाबंदर, पाचुबंदर, नायगाव व पाणजु जेटीवर दि. २८/०८/२०२५, दि.३१/०८/२०२५, दि.०२/०९/२०२५ व दि.०६/०९/२०२५ या दिवशी मनुष्यबळासहित भाडेतत्वावर बोटीची व्यवस्था करणेकामी सदर ठिकाणी वरील दिवशी मनुष्यबळासहित भडेतत्वावर बोटीची व्यवस्था श्री.अजय गजानन कोळी हयांच्या दरपत्रकातील दर प्रती बोट रक्कम रु.४४९९/- दराचे दरपत्रकास सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रमहानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये प्रती बोट रक्कम रु.४४९९/- दराचे दरपत्रकास संविदा करणेस व करारनामा, कार्यादेश देणे व काम पुर्ण झाल्यानंतर देयक अदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे. सदर मान्यता रू.20 लक्ष मर्यादेत राहील.

मनोजकुमार

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगपालिका**
**मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प) जि. पालघर, पिन नं. ४०१३०५**
**दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७**
**ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com**

---

**प्रशासकिय ठराव क्रं.** १२०४

**विभाग :- सामान्य प्रशासन**
**दिनांक :-** २२/०८/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय** : गणेशोत्सव - २०२५ अंतर्गत श्री गणेशमुर्ती विर्सजन करीता १)नारंगी जेटी नं. २२ व २)मारंबळ पाडा जेटी या ठिकाणी मनुष्यबळासह प्रत्येकी २ बोटी भाड्याने पुरविणेकरीता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** : प्रभाग समिती अ, बोळींज कार्यक्षेत्रात सार्वजनिक व खाजगी गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या तलावात गणेशमुर्तीचे विसर्जन बंद करणेत येऊन त्या जागी कृत्रिम तलावाची निर्मिती करुन सदरच्या मुर्ती कृत्रिम तलावात विसर्जन करुन त्या मुर्तीचे अवशेष वाहनांमार्फत समुद्रा लगत असलेल्या जेटीवर नेऊन बोटीने समुद्रात खोलवर विसर्जित केले जातात. सदर उपक्रम गेले तीन ते चार वर्षापासून चालू असून या अगोदर कृत्रिम तलावातील गणेश मुर्तीचे विसर्जन पेल्हार येथिल खदानी मध्ये केले जात होते. मागिल वर्षीपासून गणेशमुर्तीचे विसर्जन जेटी नं. २२ व मारंबळ पाडा येथिल जेटी मध्ये करण्यात येत आहे. या वर्षी सदर गणेश मुर्तीचे विसर्जन दि.२८/०८/२०२५ (दिड दिवस), दि.३१/०८/२०२५ (पाच दिवस), दि. ०२/०९/२०२५ (गौरी गणपती विसर्जन), दि.०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी) या चार (४) दिवशी होत आहे. सदर कामी मारंबळपाडा येथिल बोटींची व मनुष्यबळाची मदत घेण्यात येते. त्याकरीता खालील मनुष्यबळासह बोटीची आवश्यकता असून अंदाजित खर्चाची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र | बोटींची संख्या (मनुष्यबळासह) | जेटीचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ नग | नारंगी जेटी नं. २२ | १,२५,०००/- |
| २ | २ नग | मारंबळपाडा जेटी | ६०,०००/- |

वरील प्रमाणे अ.क्र. १ नारंगी जेटी नं. २२ मध्ये प्रभाग समिती अ, व सी अंतर्गत कृत्रिम तलावात विर्सजित करण्यात आलेल्या गणेश मुर्तीचे मोठ्या प्रमाणात वरील विसर्जनाच्या दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत विसर्जन केले जाते. तसेच अ.क्र. २ मारंबळ पाडा जेटी येथे खाजगी व सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन केले जाते. सदर गणेश मुर्तीचे विसर्जनाकरीता बोटींची व मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. त्याकरीता सन २०२५ या आर्थिक वर्षात गणेश विसर्जनाकरीता मन्युष्य बळासहीत बोटी भाडेतत्वार उपलब्ध करुन घेणे गरजेचे आहे. तरी वरील जेटीवर मनुष्यबळासहीत बोटी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेणे करीता दरपत्रक मागविणेकामी मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

सदर कामाकरीता मनुष्यबळासहीत बोटी भाडे तत्वावर पुरवठा करणेकामी रक्कम रु.२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखाशिर्ष सामान्य प्रशासन इतर खर्च सांकेतांक क्र. ०३१-२९९९ या लेखाशिर्षा अंतर्गत सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मान्यतेस्तव संविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय** : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अ, बोळींज अंतर्गत येणाऱ्या नारंगी जेटी क्र. २२ व मारंबळपाडा जेटी या ठिकाणी कृत्रिम तलावातील श्री गणेश मुर्तीचे तसेच खाजगी व सार्वजनिक गणेश मुर्तीचे विसर्जन जेटी वरून बोटीतून समुद्रात विसर्जन करणेकामी दि.२८/०८/२०२५ (दिड दिवस), दि.३१/०८/२०२५ (पाच दिवस), दि. ०२/०९/२०२५ (गौरी गणपती विसर्जन), दि.०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी) या चार (४) दिवसांकरीता मनुष्यबळासह भाडेतत्वावर बोटी पुरविणेकामी येणाऱ्या रक्कम रु. २,००,००० (अक्षरी-दोन लाख)इतक्या रक्कमेच्या खर्चास तसेच सदर कामासाठी दरपत्रके मागविणे बाबतची कार्यवाही करणेस व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषांगिक खर्चास महागनरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये मा. आयुक्त सो., यांना असलेल्या प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भाप्रसे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १२०५

**विभाग :-घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-**२६/०८/**२०२५**

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणेबाबतची निविदा रद्द करुन पुन:श्च नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या त्रैवार्षिक वर्षाकरिता दिनांक ०९/०५/२०२५ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.२७/०६/२०२५ रोजी उघडण्यात आलेला असून सदर निविदेमध्ये १. मे. दिपक उत्तराधी २. मे. दिनेश बी. संखे ३. मे. हेना इंटरप्रायजेस ४. मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. ५. मे. क्रिस्टल इंटीग्रेटेड सर्विसेस लि. ६. लक्ष्य इंटरप्रायजेस ७. मे. मैनदिप इंटरप्रायजेस ८. मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा ९. मे. साई गणेश इंटरप्रायजेस १०. मे. रिलायबल इंटरप्रायजेस ११. मे. शिवम इंटरप्रायजेस १२. मे. लायन सिक्युरिटी गार्ड सर्विसेस १३. मे. *उजाला लेबर कॉन्ट्रक्टर* १४. . मे. *अवरलँड इंजिनिअरिंग वर्क्स* १५. नितिन देवराव बनसोड या अभिकर्त्यांनी सहभाग घेतलेला आहे. अशाप्रकारे प्रभाग समिती ए ते आय या प्रभाग समिती करिता एकूण ५६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

याकामी सदर प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करणेकरिता याकार्यालयाकडील जा.क्र.वविशम/ घकव्य/ १०१४/ २०२५, दि. २७/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांना कळविण्यात आलेले होते. याकामी मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांनी दि. ०९/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक पडताळणी करुन अपुर्ण असलेल्या कागदपत्रांची निविदाकारनिहाय यादी सादर केलेली आहे. त्याअनुषंगाने मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांना याविभागाचे जा.क्र. वविशम/ घ.क.व्य./ ११७९/ २०२५, दि. २८/०७/२०२५ रोजी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तथापि, सदर निविदेबाबत निविदेबाबत मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा, मे. दिनेश बी. संखे, मे. उजाला लेबर कॉन्ट्रक्टर, मे. हेना इंटरप्रायजेस या अभिकर्त्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीनुसार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांना याविभागाचे जा.क्र. वविशम/ घ.क.व्य./ १३२३/ २०२५-२६, दि. १८/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये हरकतींची पडताळणी पुर्ण करुन द्वितीय लिफाफा उघडणेकामी स्वयंस्पष्ट व परिपुर्ण

अहवाल सादर करणेकामी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांनी दि. २२/०८/२०२५ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये तांत्रिक छानननी प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचा अंतिम अहवाल परिशिष्ट “अ” नुसार (पृष्ठ क्र.१५०७ ते १६३७) सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये उपरोक्त निविदा प्रक्रिया पुर्ण केल्यास निविदेबाबत भविष्य काळात साशंकता निर्माण होण्याची शक्यता असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदर निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेबाबत मत सादर केलेले आहे.

त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामाची निविदा रद्द करुन पुन:श्च नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा. निविदा समितीने दि. २५/०८/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. याकामी सदरची निविदा रद्द करुन पुन:श्च नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेस मा. निविदा समितीच्या शिफारसीनुसार पुढील प्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>ठरावाचा निर्णय :-</u>** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन २०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामाच्या निविदेबाबत मे. आर ॲण्ड बी इन्फ्रा, मे. दिनेश बी. संखे, मे. उजाला लेबर कॉन्ट्रक्टर, मे. हेना इंटरप्रायजेस या अभिकर्त्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीनुसार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांना याविभागाचे जा.क्र. वविशम/ घ.क.व्य./ १३२३/ २०२५-२६, दि. १८/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये हरकतींची पडताळणी पुर्ण करुन द्वितीय लिफाफा उघडणेकामी स्वयंस्पष्ट व परिपुर्ण अहवाल सादर करणेकामी कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांनी दि. २२/०८/२०२५ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये तांत्रिक छानननी प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचा अंतिम अहवाल सादर केलेला आहे.

निविदेमध्ये भाग घेतलेल्या अभिकर्त्यांनी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांबाबत एकमेकांच्या विरोधात हरकती घेतल्याचे सदर अहवालामध्ये नमूद केलेले आहे. तसेच निविदेतील अट क्र. २.८ नुसार अंशत: अथवा पुर्ण प्रस्ताव नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा पुर्ण अधिकार महानगरपालिकेकडे असल्याने सदर निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेबाबत महापालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांनी उपरोक्त अहवालामध्ये शिफारस केलेली आहे.

मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांनी सल्लागार म्हणून काम करताना केलेल्या निष्काळजीपणामुळे त्यांचेवर दंडात्मक तसेच करारनाम्याप्रमाणे कारवाई करण्यास व वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सन २०२५-२६, २६-२७ व २७-२८ या त्रैवार्षिक वर्षाकरिता **प्रभाग समिती ए ते आय** हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामाची निविदा रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेकामी मा. निविदा समितीने दि. २५/०८/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी त्यानुसार सदर

निविदा प्रक्रिया रद्द करुन पुन:श्च नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि - पालघर, पिन ४०१३०५
दुरध्वनी — २०५-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १२७६

विभाग :- पर्यावरण
दिनांक :- २६/०८/२०२५

**प्रस्तावाचा विषय :- पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार स्पर्धा २०२५ बाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर:-** वसई विरार शहर महानरपालिके तर्फे पर्यावरण पूरक गणेशोत्सव बाबत सालाबादप्रमाणे यावर्षी २०२५ साठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा घेणे नियोजित आहे. पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग यांनी राज्यस्तरीय उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना पुरस्कार देण्याबाबतचा दि.२० ऑगस्ट, २०२५ रोजीचा शासन निर्णयाच्या धर्तीवर आपल्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्पर्धा घेणे नियोजित आहे.

सदर पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेची मंडप परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना सहभागी होता येणार असून यासाठी एकूण १०० गुणांची स्पर्धा घेण्यात येणार आहे. सदर स्पर्धा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती कार्यालयात अर्ज करण्याचा कालावधी | २० ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२५ |
| २. | प्रभाग कार्यालय परिक्षण समिती कामकाज कालावधी | २८ ते ०६ सप्टेंबर २०२५ |
| ३. | प्रभाग समिती कार्यालय निकाल जाहिर करण्याचा दिनांक | १६ सप्टेंबर २०२५ |
| ४. | प्रभाग समिती कार्यालय मध्ये पारितोषिक वितरण कार्यक्रम दिनांक | १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ |

सहभागी होणा-या सार्वजनिक मंडळांची निवड पुढील निकषांच्या आधारे होईल.

| अ.क्र | गुणांकनासाठी बाब | गुणांकन |
|---|---|---|
| १. | **<u>कलांचे जतन व सर्वधन :</u>**<br>गायन, वादन, नृत्य, नाट्य, दशावतार, पोवाडा, लावणी, झाडीपट्टी, खडिगम्मत, वहिगायन, चित्रकला, चित्रपट, शिल्पकला, मूर्तीकला इ. विविध कलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धाचे आयोजन, लुप्त होणाऱ्या कलांचे विविध माध्यमांतून संवर्धन इ. उपक्रम. | २० |
| २. | **<u>संस्कृतीचे जतन संवर्धन :</u>**<br>दुर्मिळ नाणी, शस्त्र, भांडी इ. विषयक प्रदर्शने, कवी संमेलन, पुस्तक मेळा, अभिवाचन, वक्तृत्व, निबंध लेखन स्पर्धा इ. साहित्य विषयक उपक्रम, लुप्त होणाऱ्या कलाविष्कारांचे संवर्धन, पारंपरिक व देशी खेळांच्या स्पर्धा मंडळाचे व संस्थांचे ग्रथालय.इ.उपक्रम. | २० |
| ३. | **<u>निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे जतन व संवर्धन :</u>**<br>वने, निसर्ग, गडकिल्ले, राष्ट्रीय व राज्य स्मारक यांचे जतन संवर्धन, जनजागृती, | २० |

| | | |
|---|---|---|
| | स्वच्छता, पर्यटन व सामाजिक आर्थिक सक्षमीकरणासाठी केलेले जनजागृतीपर कार्य, व संवर्धन कार्य इ. | |
| ४. | **सामाजिक कार्य :**<br>महिला- जेष्ठ नागरिक – वंचित घटक, दिव्यांग अशा विविध समाजघटकांसाठी आयोजित केलेले उपक्रम.<br>शासनाने राबविलेल्या विविध लोकोपयोगी योजना, संकल्पनावर आधारित उपक्रमाशी संबधित कार्य, उदा. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव इ. आधुनिक तंत्रज्ञान, गाव दत्तक योजना, आरोग्य , शिक्षण, क्रिडा, कृषी, विज्ञान, समाज सुधारणा विषयक उपक्रम, अंधश्रध्दा व अनिष्ट रुढी परंपरा चालीरीती यावर प्रबोधन करणारे कार्यक्रम व कार्य इ. | २० |
| ५. | **गणशोत्सव आयोजनातील विधायकता :**<br>पर्यावरणपूरक मूर्ती, **मूर्तीची उंची कमीत कमी ६ फुट,** पर्यावरणपूरक सजावट व विदयुत रोषणाई, ध्वनी, वायु व जलप्रदूषण विरहित परिसर, उत्सव काळात गणेशभक्तांसाठी देऊ केलेल्या प्राथमिक सुविधा तसेच आयोजनातील शिस्त व परिसरातील कायमस्वरुपी स्वच्छतेविषयी जनजागृती व कार्य, कार्य, गणेशभक्तांसाठी असणाऱ्या सुविधा प्रथमोपचार पेटी, पाणी इ. सुविधा, **"एक गाव एक गणपती"** सारखे विधायक उपक्रम असणारे मंडळ, मंडळाच्या कार्यकारणीत महिलांची संख्या एकूण पदांच्या किमान ३० टक्के असणारे मंडळ इ. विधायकता | २० |
| | **एकुण** | १०० |

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयात **पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पुरस्कार स्पर्धा २०२५ या** स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये भरावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. तसेच विजेत्याची निवड करण्यासाठी प्रभाग समिती स्तरावर खालील प्रमाणे प्रभाग कार्यालय परिक्षण समिती राहील.

१) उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी

२) प्र.सहा.आयुक्त/सहा.आयुक्त

३) उपअभियंता

४) पर्यावरण दूत (किमान १ सदस्य)

५) पत्रकार प्रतिनिधी

उपरोक्त प्रमाणे सर्व निवड सदस्य किंवा कोणीही एक प्रतिनिधी प्रत्यक्ष गणेशउत्सव स्थळाना भेट देतील तसेच मंडळाकडून आवश्यक असल्यास व्हिडीओ ग्राफी, फोटोग्राफ व कागदपत्रे याबाबत पाहणी करतील आणि माहिती घेतील त्यानंतर सोबत जोडलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये गुणांकन करतील आणि खालील प्रमाणे विजेते गणेश मंडळ यांची निवड परिशिष्ट "क" मध्ये जाहीर करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **गुणानुक्रमांक** | **बक्षिसे** |
|---|---|---|
| १. | प्रथम पारितोषिक | रु.२५,००१/- |
| २. | द्वितीय पारितोषिक | रु.१५,००१/- |
| ३. | तृतीय पारितोषिक | रु.१०,००१/- |
| ४. | उत्तेजनार्थ १० पारितोषिके | रु.१००१/- |

अशा प्रकारे प्रत्येक प्रभाग समिती साठी १३ बक्षीसे , प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत.यासाठी प्रत्येक प्रभाग समिती करीता ६०,०१३/- रुपये याप्रमाणे एकुण ९ प्रभाग समिती साठी ५,४०,११७/- रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये पर्यावरण सर्वधन चे सा.क्र.५६०-३२६० या लेखाशिर्षाखाली येणार खर्च १,००,००,०००/- (अक्षरी - एक कोटी रुपये ) या तरतुदी मधून केला जाऊ शकतो. तरी रोख पारितोषिकासाठी एकूण ५,४०,११७/- (अक्षरी- पाच लाख चाळीस हजार एकशे सतरा) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

**ठराव / निर्णय :-**

वसई विरार शहर महानरपालिके तर्फे पर्यावरण पूरक गणेशोत्सव बाबत सालाबादप्रमाणे यावर्षी २०२५ साठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना पुरस्कार देण्यासाठी पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग यांनी राज्यस्तरीय उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाना पुरस्कार देण्याबाबतचा दि.२० ऑगस्ट २०२५ रोजीचा शासन निर्णयाच्या धर्तीवर आपल्या वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्पर्धा घेण्यात येणार आहे. सदर स्पर्धेसाठी प्रभाग समिती निहाय प्रथम पारिषोतिक, रु. २५००१/-, द्वितीय पारितोषिक रु. १५००१/-, तृतिय पारितोषिक रु. १०,००१/- आणि उत्तेजनार्थ १० पारितोषिके प्रत्येकी रु. १००१/- अशा प्रकारे प्रत्येक प्रभाग समिती साठी १३ बक्षीसे , प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक प्रभाग समिती करीता ६०,०१३/- रुपये याप्रमाणे एकुण ९ प्रभाग समिती साठी ५,४०,११७/- रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. यास्तव सदर खर्च वसई विरार शहर महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये पर्यावरण सर्वधन सा.क्र.५६०-३२६० या लेखाशिर्षाअंतर्गत रु. १,००,००,०००/- (अक्षरी - एक कोटी रुपये ) या तरतुदी मधून केला जाऊ शकतो. तरी रोख पारितोषिकासाठी एकूण ५,४०,११७/- (अक्षरी- पाच लाख चाळीस हजार एकशे सतरा) इतक्या खर्चास व अनुषंगिक कार्यवाहीस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी ( भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार (प.)**

**जि.पालघर, पिन क्र. ४०१३०३**

**प्रशासकीय ठराव क्र.** १२७७

**विभाग : आस्थापना कक्ष-१**
**दिनांक :-** २६/०८/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** **श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांच्या स्वेच्छा सेवानिवृतीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "अे" बोळींज येथे आस्थापनेवरील श्री अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांनी दि. २९/०५/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे यांची नियुक्ती तत्कालीन ग्रामपंचायत बोळींज, मासिक सभा दि.२९/०९/१९९६ ठराव क्र.१७४ (३३) अन्वये दि. ०१/१०/१९९६ पासून लिपीक या पदावर मासिक रु.९००/- ठोक पगारावर करण्यात आली. तद्नंतर ग्रामपंचायत मासिक सभा दि. १३/०३/१९९७ ठराव क्र.२२७ (३६) अन्वये वेतनश्रेणी ९५०-२०-११०० EB-२५-१५०० प्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करुन दि. ०१/०४/१९९७ पासून त्यांना तत्कालीन ग्रामपंचायत सेवेत कायम करण्यात आले. तत्कालीन ग्रामपंचायत बोळींजचे समावेशन महानगरपालिकेत झाल्यानंतर मा. आयुक्त सो. यांचे कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आस्था/ ६६९/२०२३ दि. १७/०४/२०२३ अन्वये श्री.अशोक लक्ष्मण म्हात्रे यांना वरिष्ठ लिपीक पदावर पदोन्नती देण्यात आली.

श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांचे नेमणूकी पासुन ते सध्याची वसई विरार शहर महानगरपालिका अशी त्यांनी एकुण २८ वर्षे ४ महिने २७ दिवस इतकी सेवा बजावली आहे. त्यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी अथवा खटला न्यायप्रविष्ठ नाही. त्यांचे सध्याचे वय ५७ वर्षे असून त्यांची शारिरीक प्रकृत्ती साथ देत नसल्याने त्यांना काम करणे अवघड होत आहे. सबब कारणांमुळे स्वेच्छा सेवानिवृत्ती हवी असल्याचा त्यांनी अर्जामध्ये उल्लेख केला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन १९८२ मधील कलम ६६ नुसार स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याबाबत पोट नियम (१) मध्ये नमुद केल्यानुसार स्वेच्छानिवृत्ती करिता शासकीय कर्मचाऱ्यांनी दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिकाऱ्याने स्विकारणे आवश्यक असेल मात्र उपरोक्त अर्जामध्ये नमुद केलेल्या कालावधी संपण्यापुर्वी (म्हणजेच अर्जाच्या तारखेच्या तीन महीन्यांच्या आत) नियुक्ती प्राधिकाऱ्याने सेवानिवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर त्या कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासुन सेवानिवृत्ती अंमलात येईल. श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांनी दि. २९/०५/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती अर्ज दिल्याने त्यावर दिनांक २८/०८/२०२५ पूर्वी निर्णय होणे आवश्यक आहे.

तथापि श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती महापालिका स्तरावर परवानगी देण्यात आल्यानंतर, त्यांना सेवानिवृत्तीनंतर उपदान, रजा रोखीकरण, परिभाषित अंशदान योजना निधी व इतर अनुषंगिक लाभ देणे आवश्यक आहे.

तरी श्री.अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक यांच्या दिनांक २९/०५/२०२५ च्या अर्जावर महानगरपालिका स्तरावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव प्रशासकीस व वित्तीय मंजुरीस्तव आदेशास्तव सादर.

**ठराव निर्णय :-** श्री. अशोक लक्ष्मण म्हात्रे, वरिष्ठ लिपिक प्रभाग समिती "अे" बोळींज, यांनी दिनांक २९/०५/२०२५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती मिळणेबाबतच्या विनंती अर्जानुसार त्यांची म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ कलम ६६ पोटनियम (१) अन्वये दि.२८/०८/२०२५ पासून मध्यान्नोत्तर महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यास तसेच त्यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर सेवा उपदान, रजा रोखीकरण, परिभाषित अंशदान योजना निधी व इतर अनुषंगिक लाभ देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**(मनोजकुमार सुर्यवंशी)** भा.प्र.से.
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार (प.) जि. पालघर, पिन नं.४०१ ३०३**

**दुरध्वनी-०२५-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७**

**ई-मेल - Vasaivirarcorporation@yahoo.com**


**प्रशासकीय ठराव क्र.** १२७८

**विभाग :- अन. बांध. व अति. निर्मुलन नियंत्रण कक्ष**

**दिनांक :-** २९/०८/२०२५

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अतिधोकादायक (सी-१) प्रवर्गातील इमारतींच्या निष्कासनासाठी ई-निविदा प्रक्रिया करुन ठेकेदारांची नियुक्ती करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार उपप्रदेशातील भुतपुर्व ०४ नगरपालिका व ५३ गावांचा समावेश होऊन सन २००९ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली आहे व २०१० साली नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. वसई विरार महानगरपालिकेची रचना ही ०९ प्रभाग समिती (अे ते आय) व विशेष नियोजन प्राधिकरण (२१ गावे) अशी करण्यांत आली असून महानगरपालिका कार्यक्षेत्रात येणाऱ्या बहुतांश इमारती हया ३० वर्षे जुन्या असल्या कारणाने जीर्ण झाल्या असून पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने संदर्भिय शासन परिपत्रक क्र.विसआ-२०१५/प्र.क्र.३४९/नवि-२०, दि.०५/११/२०१५ नुसार त्या इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करुन अति धोकादायक (सी-१), धोकादायक (सी-२ A), किरकोळ धोकादायक (सी-२ B) व सी-३ स्वरुपातील आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सी-१ इमारतींची सद्यस्थिती खालीलप्रमाणे

| प्रभाग समिती | सी - संवर्गातील इमारतींची संख्या | निष्कासित केलेल्या इमारतींची संख्या | सी-१ पैकी निष्कासन बाकी असल्याची संख्या |
|---|---|---|---|
| प्रभाग समिती अे ते आय | १४४ | ४६ | ९८ |

सदरच्या धोकादायक मिळकती या मालक/भोगवटादार यांनी रिक्त करुन स्वत: निष्कासित करणे आवश्यक आहे. परंतु त्याचेमार्फत ही कार्यवाही होत नाही तसेच पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या अनधिकृत बांधकामा संदर्भात वेळोवेळी मा. उच्च न्यायालयाचे निर्णय, नागरिकांच्या तक्रारी तसेच शासन धोरणानुसार तोडक कार्यवाही करणे आवश्यक ठरते, या वेळेत अनधिकृत तसेच धोकादायक मिळकतीवर कारवाई करण्याठी महानगरपालिकेस विविध प्रकारचे साहित्य व मशिनरी (यंत्रसामुग्री) व साहित्य भाडे तत्त्वावर आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन ठेकेदारास देयक अदा करावे लागते, तसेच सद्यस्थितीत ही बांधकामे तोडणेसाठी मनपामार्फत ठेकेदार नेमलेला नाही. मनपा कार्यक्षेत्रातील ही बांधकामे निष्कासित करणेकामी स्वामित्व धन (Royalty) घेऊन आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व साहित्य सामुग्री उपलब्ध करुन देतील अशी इच्छुक व्यक्ती, विविध संस्था व ठेकेदार यांचेकडून अर्ज मागविणे उचित होईल. या बांधकामामध्ये असलेले लोखंड (ग्रील/गज) लाकूड, डेब्रिज (मलबा) व विविध प्रकारचे साहित्य यांची Offset Value निश्चित करणेत येईल. यासाठी खाजगी मान्यता प्राप्त अथवा शासकीय तज्ञ यांचेमार्फत मिळकत निष्कासनापूर्वी एकूण मुल्यांकन निश्चित करुन त्यानंतर मनपातील नियुक्त ठेकेदार यांचेकडून मनपास रॉयल्टी स्वरुपात ठराविक रक्कम भरणेअंती संपूर्ण इमारत संबंधित ठेकेदाराकडून महानगरपालिकेने कोणताही खर्च न करता निष्कासित करता येईल व त्याबद्दल ठेकेदारास मिळकतीतील लोखंड, लाकूड, डेब्रिज यांचा उपयोग करता येईल. ही कार्यप्रणाली अवलंबविणेस महानगरपालिकेस आर्थिक भुर्दंड बसणार नाही तसेच अनधिकृतपणे उभारलेल्या पूर्ण असलेल्या मिळकती, धोकादायक मिळकती यावर वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

सन २०२३-२४ मध्ये सी-१ संवर्गातील १४४ इतक्या इमारती आढळल्या असून ४६ इतक्या इमारती निष्कासीत करण्यात आल्या आहेत व ९८ इतक्या शिल्लक असून पुढील वर्षी ही संख्या वाढणार आहे. सदर इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करुन अंतिमत: अति धोकादायक (सी-१) दर्जाची आढळल्यास निष्कासन करणेकामी महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागामार्फत स्वतंत्र ठेकेदारांची नियुक्ती करून अति धोकादायक (सी-१) प्रवर्गातील इमारतींच्या निष्कासनासाठी सी.यू.सी. विभागामार्फत ई-निविदा प्रसिध्द करणे तसेच संबंधित ठेकेदारामार्फत यंत्रसामुग्रीसह इमारत ही निष्कासित करुन त्या मोबदल्यात महापालिकेस रॉयल्टी स्वरुपात रक्कम निश्चित करुन निष्कासनाचे काम पूर्ण करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठरावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालानुसार सी-१ प्रवर्गातील इमारती निष्कासन करणेकामी महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया करुन ठेकेदारांची नियुक्ती करणे तसेच संबंधित ठेकेदारामार्फत यंत्रसामुग्रीसह इमारत निष्कासित करुन त्या मोबदल्यात महापालिकेस रॉयल्टी स्वरुपात रक्कम निश्चित करुन निष्कासनाचे काम पूर्ण करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** 1270

विभाग :- वाहन विभाग
दिनांक :- 28/08/2025

**विषय :- श्रीगणेश मूर्ती विसर्जनासाठी कन्व्हेअर बेल्ट पुरवठा करणेकामी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदाधारकासमवेत संविदा करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | रु. १६,००,०००/- |
| **प्रशासकीय मान्यता** | :- | मा. प्रशासकीय ठराव क्र. , दि. /०८/२०२५ |
| **ई-निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक** | :- | दि. १८/०७/२०२५ ते दि.२८/०७/२०२५ |
| **ई टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)** | :- | दि. २८/०७/२०२५ |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा** | :- | ०३ |
| **प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी** | :- | उप.आयुक्त (वाहन) |
| **निविदा समिती मंजूरी** | :- | दि. १३/०८/२०२५ |
| **ई टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)** | :- | दि.१३/०८/२०२५ |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार** | :- | ०३ |

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात श्रीगणेशोत्सव – २०२५ साजरा करण्यात येणार आहे. श्रीगणेशोत्सव साजरा करणेसाठी महानगरपालिकेने उपाययोजना केलेल्या आहेत. तसेच श्रीगणेशमूर्तींचे सुरक्षित विसर्जन होणेकामी कन्वेअर बेल्ट खरेदी करणेसाठी दि.१८/०७/२०२५ रोजी ई-निविदा मागविण्यात आलेली होती. या निविदेत मे. स्कायग्रीप ऑटोमशन, मे. फ्रोपॅक इंडस्ट्रिज एल.एल.पी व मे. ए.एस. एंटरप्रायजेस या ३ निविदाकारांनी सहभाग घेतलेला होता. या ३ निविदाधारकांची कागदपत्रांची पूर्तता झालेली असल्याने दि.१३/०८/२०२५ रोजी ई-निविदेचा वित्तीय बाबींचा लिफाफा उघडण्यात आलेला आहे.

सदर लिफाफा क्र.२ मध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| यंत्रसामुग्रीचे नाव | निविदाधारकाचे नाव व दर (सर्व करांसहित) | | |
|---|---|---|---|
| | **मे. स्कायग्रीप ऑटोमशन** | मे. फ्रोपॅक इंडस्ट्रिज एल.एल.पी | मे. ए.एस. एंटरप्रायजेस |
| **कन्व्हेअर बेल्ट** | **१५,६७,४९९.०२०/-** | १५,७८,२९९.५६०/- | १५,९०,५६९.२००/- |

उपरोक्त तक्त्याचे परिक्षण केले असता मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी आहेत. करिता प्राप्त झालेल्या दरामध्ये वाटाघाटी करणेकामी मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांना दि.१८/०८/२०२५ रोजी मा. उप.आयुक्त (वाहन) यांचे दालनात बोलविण्यात आले होते.

सदर वाटाघाटी बैठकीत चर्चा केलेनुसार मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांनी दि. १८/०८/२०२५ रोजी लेखी पत्राने वाटाघाटी अंतीचे दर कळविलेले आहे. ते खालीलप्रमाणे :-

| **यंत्रसामुग्रीचे नाव** | **मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांचे निविदेतील दर (सर्व करांसहित)** | **मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांनी वाटाघाटीअंती कमी केलेले दर (सर्व करांसहित)** |
|---|---|---|
| **कन्व्हेअर बेल्ट** | **१५,६७,४९९.०२०/-** | १५,४५,४९९.०२ |

उपरोक्तप्रमाणे मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांनी वाटाघाटीअंती अंतिम केलेले न्युनमत दर योग्य व वाजवी आहेत. तसेच या न्युनतम दरांना मा. निविदा समितीने दि.२१/०८/२०२५ मंजूरीस शिफारस देण्यात आलेली आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करणेसाठी कन्वेअर बेल्ट यंत्रसामुग्री मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांनी वाटाघाटी अंती अंतिम केलेल्या र र. रु. १५,४५,४९९.०२/- दराच्या निविदेस मंजूरी देवून मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांचेसमवेत संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

**<u>प्रस्तावास मंजूरी</u> :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन करणेसाठी कन्वेअर बेल्ट यंत्रसामुग्री मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांनी वाटाघाटी अंती अंतिम केलेल्या र र. रु. १५,४५,४९९.०२/- दराच्या निविदेस मंजूरी देवून मे. स्कायग्रीप ऑटोमशन यांचेसमवेत संविदा करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

**(दिपक सावंत)**
**अतिरिक्त आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**